९९. (१) पोट-कलम (४) चा खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद असेल, व विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि अधिक चांगल्या प्रकारच्या सामुदायिक जीवनासाठी विविध विद्यार्थी संघांच्या पाठ्येतर कार्यक्रमांचे प्रचालन करण्याकरिता व त्याबाबतीत समन्वय साधण्याकरिता, विद्यापीठाच्या विभागांकरिता एक विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठाच्या प्रत्येक संचालित महाविद्यालय किंवा परिसंस्था आणि प्रत्येक संलग्न महाविद्यालय यांच्याकरिता एक महाविद्यालय विद्यार्थी परिषद असेल. या परिषदा कोणत्याही राजकीय चळवळींमध्ये भाग घेणार नाहीत. विद्यार्थी परिषद.

(२) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) सर्व विद्यापीठ विभागांत पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेला सभापती ;

(ख) सर्व विद्यापीठ विभागांत पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेला सचिव ;

(ग) सर्व विद्यापीठ विभागांत पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेली एक महिला प्रतिनिधी ;

(घ) सर्व विद्यापीठ विभागांमध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाद्वारे, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांच्यामधून निवडण्यात आलेला एक प्रतिनिधी ;

(ङ) त्या विभागामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणातून निवडून दिलेला प्रत्येक विभागामधील एक विद्यार्थी ;

(च) जे विद्यार्थी विहित केलेल्या निकषाच्या आधारावर अनुक्रमे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा व सांस्कृतिक कार्य यांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून कुलगुरुने नामनिर्देशित केलेल्या प्रत्येकी (क) राष्ट्रीय सेवा योजना (ख) राष्ट्रीय छात्र सेना (ग) क्रीडा आणि (घ) सांस्कृतिक कार्य यांमधील प्रत्येकी एक विद्यार्थी ;

(छ) संचालक, विद्यार्थी विकास हा पदसिद्ध सदस्य असेल.

(३) प्रत्येक परिसंस्था, संचालित महाविद्यालय किंवा संलग्न महाविद्यालय यांच्याकरिता असलेल्या महाविद्यालय विद्यार्थी परिषदेमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेला सभापती ;

(ख) त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाद्वारे निवडण्यात आलेला सचिव ;

(ग) त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाद्वारे निवडून दिलेली एक महिला प्रतिनिधी ;

(घ) त्या महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाद्वारे, त्यांच्यामधून आळीपाळीने अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांच्यामधील एक प्रतिनिधी :

परंतु, विद्यापीठ या खंडाच्या प्रयोजनासाठी प्रत्येक महाविद्यालयाकरिता आरक्षणाचा प्रवर्ग चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे निश्चित करील ;

(ङ) महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या निर्वाचक गणाद्वारे निवडून दिलेला प्रत्येक वर्गामधील एक विद्यार्थी ;

(च) विहित केलेल्या निकषाच्या आधारावर अनुक्रमे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा व सांस्कृतिक कार्य यांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून प्राचार्यांने नामनिर्देशित केलेला (क) राष्ट्रीय सेवा योजना (ख) राष्ट्रीय छात्र सेना (ग) क्रीडा आणि (घ) सांस्कृतिक कार्ये यांमधील प्रत्येकी एक विद्यार्थी ;

(छ) महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून नियुक्त केलेल्या विद्यार्थी परिषदेचा समन्वयक म्हणून एक वरिष्ठ अध्यापक आणि संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यक्रम अधिकारी आणि कायमस्वरूपी निमंत्रित म्हणून राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी.

(४) (क) पुढील सदस्यांचा समावेश असणारा एक विद्यापीठ विद्यार्थी संघ असेल :—

(एक) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि प्रत्येक महाविद्यालय विद्यार्थी परिषद यांचे सभापती ;

(दोन) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि प्रत्येक महाविद्यालय विद्यार्थी परिषद यांचे सचिव ;

(तीन) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि प्रत्येक महाविद्यालयाची विद्यार्थी परिषद यांच्या महिला प्रतिनिधी ;

(चार) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद आणि प्रत्येक महाविद्यालयाची विद्यार्थी परिषद यांच्यातील अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांच्यामधील विद्यार्थी प्रतिनिधी.

(ख) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला सभापती ;

(दोन) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला सचिव ;

(तीन) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेली एक महिला प्रतिनिधी ;

(चार) विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या विद्यार्थी सदस्यांनी त्यांच्यामधून आळीपाळीने निवडून दिलेला अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती, (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांच्यामधील एक प्रतिनिधी ;

(पाच) विहित निकषांच्या आधारावर अनुक्रमे जे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, क्रीडा व सांस्कृतिक कार्य यामध्ये सहभागी झालेले आहेत अशा विद्यापीठ विभागांच्या आणि संलग्न महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांमधून संचालक, विद्यार्थी विकास यांच्याशी विचारविनिमय करून, विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या सभापतीने नामनिर्देशित केलेला (क) राष्ट्रीय सेवा योजना, (ख) राष्ट्रीय छात्रसेना, (ग) क्रीडा व (घ) सांस्कृतिक कार्य यांमधील प्रत्येकी एक विद्यार्थी ;

(सहा) विद्यार्थी विकास संचालक मंडळ ; संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण ; संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार हे कायमस्वरूपी निमंत्रित असतील.

(५) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या पहिल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु असेल आणि त्याला योग्य वाटतील असे इतर अधिकारी त्या बैठकीस उपस्थित असतील.

(६) कोणताही विद्यार्थी, जर त्याची/तिची पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून नावनोंदणी झाली असेल तरच कोणत्याही विद्यार्थी परिषदेचा सदस्य होण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असेल.

(७) निवडणुकीच्या कालावधीमध्ये महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या हजेरीपटावरील विद्यार्थी वगळता कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही नात्याने निवडणूक प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी देण्यात येणार नाही. या शर्तीचे उल्लंघन करणारा कोणताही विद्यार्थी किंवा उमेदवार हा, त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास त्याचबरोबर त्याची उमेदवारी रद्द केली जाण्यास पात्र असेल.

(८) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद, प्रत्येक परिसंस्था, संचालित महाविद्यालय किंवा संलग्न महाविद्यालय विद्यार्थी परिषद आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषद यांचा अर्थसंकल्प, बैठकीची वारंवारता ही परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल ;

(९) विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थी सदस्यांची निवडणूक ही, प्रत्येक वर्षी, शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर विहित करण्यात येईल अशा दिनांकास घेण्यात येईल. निवडून आलेल्या विद्यार्थी सदस्यांचा पदावधी हा, दरम्यानच्या कालावधीत या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निरर्हता त्यांनी आपल्यावर ओढवून घेतलेल्या नसतील तर निवडणुकीच्या दिनांकापासून सुरू होऊन शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिवसापर्यंत असेल, आणि त्यानंतर तो समाप्त होईल.

(१०) विद्यार्थी परिषदेच्या एक तृतीयांश सदस्यांनी बैठकीची गणपूर्ती होईल. बैठकीचे कामकाज चालविण्यासंबंधीची कार्यपद्धती आणि अशा इतर बाबी परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. दर तीन महिन्यांतून किमान एकदा परिषदेची बैठक घेण्यात येईल.

(११) निवडणुकीची प्रक्रिया, अधिकार व कर्तव्ये, निवडणूक घेणारे प्राधिकरण, अशा निवडणुका घेणारी यंत्रणा, उमेदवार व निवडणूक प्रशासक यांच्यासाठी आचारसंहिता आणि अशा निवडणुकीच्या संबंधातील तक्रार निवारण यंत्रणा ही, राज्य शासनाकडून **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(१२) या कलमाच्या तरतुदी ह्या, राज्य शासनाने पोट-कलम (११) अन्वये आदेश काढल्यानंतर, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून अंमलात येतील.

इमारत व बांधकाम समिती.

१००. (१) विद्यापीठातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासंबंधातील अनेक लहान व मोठी बांधकामे कार्यक्षमतेने व कालबद्ध रीतीने पार पाडण्यासाठी एक इमारत व बांधकाम समिती असेल.

(२) इमारत व बांधकाम समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(क) कुलगुरू – अध्यक्ष ;

(ख) प्र-कुलगुरू ;

(ग) व्यवस्थापन परिषदेवर कुलपतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती ;

(घ) विद्यापीठ ज्या प्रदेशात आहे त्या प्रदेशाचा प्रभार असणारा सार्वजनिक बांधकाम विभागाचा मुख्य अभियंता, किंवा त्या प्रदेशातील कार्यकारी अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली त्याची नामनिर्देशित व्यक्ती ;

(ङ) कुलगुरुने नामनिर्देशित केलेला खाजगी क्षेत्रातील एक प्रख्यात अभियंता ;

(च) कुलगुरुने नामनिर्देशित केलेला खाजगी क्षेत्रातील एक प्रख्यात वास्तुविशारद ;

(छ) कुलसचिव ;

(ज) वित्त व लेखा अधिकारी ;

(झ) विद्यापीठाचा कार्यकारी अभियंता – सदस्य-सचिव.

(३) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त, समितीचे सर्व सदस्य पाच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करतील आणि ते लागोपाठच्या दुसऱ्या मुदतीसाठी पात्र असणार नाहीत.

(४) जर एखाद्या सदस्याचे पद रिक्त झाले असेल तर ते पद कुलगुरुकडून एक महिन्याच्या आत भरण्यात येईल आणि अशा प्रकारे नियुक्त केलेला सदस्य पद रिक्त झाले नसते तर अगोदरच्या सदस्याने जितक्या मुदतीकरिता ते पद धारण केले असते तितक्याच उर्वरित मुदतीकरिता ते पद धारण करील.

(५) इमारत व बांधकाम समिती,—

(क) व्यवस्थापन परिषदेच्या निदेशान्वये आणि संपूर्ण अधीक्षणाखाली, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभिकरणामार्फत करावयाच्या मोठ्या बांधकामांसह सर्व प्रकारची कामे करून घेण्यासाठी जबाबदार असेल ;

(ख) अर्थसंकल्पातील निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून, परिरक्षणाच्या कामांना प्रशासकीय मान्यता आणि वित्तीय मंजुरी देईल ;

(ग) सर्व लहान आणि मोठ्या बांधकामांच्या संदर्भात, व्यवस्थापन परिषदेस शिफारस करील आणि प्रशासकीय मान्यता आणि खर्चास मंजुरी मिळवील ;

(घ) परिरक्षणाची कामे, लहान बांधकामे आणि मोठी बांधकामे स्वतंत्रपणे विनिर्दिष्ट करून आगामी वर्षात करावयाच्या " बांधकामाच्या कार्यक्रमाची " वित्त व लेखा समितीमार्फत व्यवस्थापन परिषदेला शिफारस करील ;